# अंतिम फेरीत पाच महाविद्यालये

## ‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धेला विभागीय स्तरावर उत्स्फूर्त प्रतिसाद

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** प्रेम, ग्रामविकास, पती-पत्नीमधील संबंध, वर्तमानातील सामाजिक आणि राजकीय प्रश्न, अशा विविध सामाजिक विषयांची प्रभावी मांडणी करणाऱ्या पाच एकांकिकांनी ‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धेच्या नागपूर विभागीय प्राथमिक फेरीतून अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. या स्पर्धेची विभागीय फेरी लवकरच होणार आहे. या फेरीतील विजेता संघ मुंबई येथे होणाऱ्या महाअंतिम फेरीत नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करेल.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कलागुणांचे प्रदर्शन करण्यासाठी ‘लोकसत्ता’ने या स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. विदर्भातील विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत नावीन्यपूर्ण सादरीकरणाचे दर्शन घडवले. ‘लोकसत्ता लोकांकिका’ची अमरावती विभागाची प्राथमिक फेरी १७ ऑक्टोबरला अमरावती येथे तर रविवार १८ ऑक्टोबरला नागपूर विभागाची प्राथमिक फेरी सर्वोदय आश्रमाच्या सभागृहात पार पडली.

नागपूर, अमरावती, वर्धा, चंद्रपूर, अकोला आणि शेगाव येथील महाविद्यालयांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. दोन दिवस रंगलेल्या प्राथमिक फेरीत शहरांसह ग्रामीण भागातील विविध प्रश्न आणि सामाजिक वास्तव विद्यार्थ्यांनी एकांकिकांच्या माध्यमातून मांडले. विषयांची निवड, अभिनय आणि सादरीकरण यांचा सुरेख मेळ या स्पर्धेत पाहायला मिळाला. एकांकिकांमधील विषयवैविध्य आणि सादरीकरणातील प्रयोगशीलतेमुळे परीक्षकांसमोरही आव्हान निर्माण झाले. अभिनेते, दिग्दर्शक, निर्माता संजय भाकरे आणि लेखक, दिग्दर्शक विशाल तराळ यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेनंतर त्यांनी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले.

**प्रायोजक**

- मुख्य प्रायोजक : **जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण**
- सहप्रस्तुती : **सॉफ्ट कॉर्नर**
- सहप्रायोजक : **एनकेजीएसबी को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीस मार्केट्स**
- साहाय्य : **अस्तित्व**
- टॅलेंट पार्टनर : **आयरिस प्रोडक्शन**



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूरच्या ‘बाप’ नाटकातील प्रसंग.



मागील काही वर्षांत एकांकिका सादरीकरणाचे प्रमाण कमी होत असताना ‘लोकसत्ता’ने सुरू केलेल्या उपक्रमामध्ये एकांकिकांचा दर्जा दिसून आला. ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. विद्यार्थ्यांनी उत्तम सादरीकरण केले असून, एकांकिकांच्या विषयांमध्ये वैविध्य जाणवले. युवा पिढी गंभीर विचार करते, हे या सादरीकरणांतून दिसून आले. विद्यार्थी केवळ विचार मांडत नाहीत, तर त्यातून विचारांची देवाणघेवाणही करतात हे ‘लोकसत्ता’च्या या व्यासपीठावर दिसून आले. ज्येष्ठ रंगकर्मींनीही पुढे येऊन या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक बनणे आवश्यक आहे.
**– संजय भाकरे,** अभिनेते, दिग्दर्शक, निर्माता (स्पर्धा परीक्षक)



‘लोकसत्ता लोकांकिका’ हा कौतुकास्पद उपक्रम आहे. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्यामधील कला सादर करण्याची संधी मिळते. विशेष म्हणजे, ‘ओटीटी’च्या या काळात एकाही एकांकिकेमध्ये अश्लीलता दिसून आली नाही. तसेच तरुण रंगमंचावर दिसल्याने आनंद झाला. या एकांकिकांमध्ये नव्या संहिता आणि नव्या चेहऱ्यांना संधी मिळते, ही महत्त्वाची बाब आहे. रंगभूमीच्या उत्कर्षासाठी असे व्यासपीठ आवश्यक आहे.
**– विशाल तराळ,** लेखक, दिग्दर्शक (स्पर्धा परीक्षक)

### अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या एकांकिका

(१) ‘प्रोटेस्ट’- श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती. (२) ‘अश्विनी कार्तिक’ - समाजकार्य महाविद्यालय अमरावती. (३) ‘साद’ - विद्याभारती महाविद्यालय अमरावती. (४) ‘लालटेन’ - विठ्ठलराव खोब्रागडे बी.एड. कॉलेज नागपूर. (५) ‘बाप’- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर.

# बारामतीत उद्योजकावर सत्तूरने हल्ला

**पुणे :** बारामतीतील कटफळ परिसरात पुण्यातील उद्योजक राणा सूर्यवंशी यांच्यावर हल्ला झाल्याची घटना रविवारी घडली. हल्ल्यात सूर्यवंशी जखमी झाले असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, या घटनेनंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

सूर्यवंशी विमानतळ परिसरात असताना हल्लेखोर त्यांच्याजवळ आले. पुष्पगुच्छ देण्याच्या बहाण्याने जवळ येऊन त्यांनी अचानक सूर्यवंशी यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या हाताला दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. उपविभागीय पोलिस अधिकारी चैतन्य कदम म्हणाले, ‘राणा सूर्यवंशी यांच्यावर सत्तूरने वार झाला आहे.’

**‘गुन्हेगारांना धाक नाही’**

‘गुन्हेगारांना कायद्याचा धाक नाही. या घटनेमुळे राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सूर्यवंशी यांच्यावर हल्ल्यामागचे कारण काय आहे, याचा शोध पोलिसांनी घ्यावा’, अशी मागणी खासदार सुळे यांनी केली आहे.

# ‘गोकुळ’साठी विक्रमी ९९.९६ टक्के मतदान

## दोन्ही बाजूंकडून विजयाचे दावे, आज निकाल





वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्वाखाली ठरावधारक गड्ड्याने मतदानासाठी आले. गोकुळसाठी आमदार सतेज पाटील यांनी गगनबावडा येथे मतदानाचा हक्क बजावला.

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्याची आर्थिक वाहिनी मानल्या जाणाऱ्या ’गोकुळ’(कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ) च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी रविवारी ९९.९६ टक्के इतके विक्रमी मतदान पार पडले.

या निवडणुकीत एकूण ५ हजार ४१६ मतदारांपैकी ५ हजार ४१४ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. केवळ दोन मतदार वगळता उर्वरित सर्वांनी मतदानात हिरिरीने भाग घेतला. एका मतदाराचे निधन झाले होते, तर दुसरा मतदार परगावी असल्यामुळे मतदान करू शकला नाही. आजरा आणि गडहिंग्लज तालुक्यात ९९ टक्के, तर जिल्ह्यातील उर्वरित सर्व तालुक्यांमध्ये १०० टक्के पूर्ण मतदान झाले. मतदारांना केंद्रापर्यंत आणण्यासाठी दोन्ही आघाडीच्या नेत्यांनी मोठी मोर्चेबांधणी सुरू केली होती.

विरोधकांच्या‘ राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडी’नेही आपल्या मतदारांची एकत्र ने-आण करण्यावर विशेष भर दिला. मतदान संपताच दोन्ही आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांनी आपापल्या विजयाचा दावा केला आहे.

# ‘सेवा-सुविधांचे दर ठळक लावा’

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** खासगी रुग्णालयांमधील उपचारांच्या खर्चाबाबत पारदर्शकता आणण्यासाठी राज्यातील सर्व खासगी रुग्णालये आणि अन्य वैद्यकीय आस्थापनांना वैद्यकीय सेवा व उपलब्ध सुविधांचे दरपत्रक ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने १६ ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, दरपत्रक मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये लावणे आवश्यक आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायतने या निर्णयाचे स्वागत केले आहे.

दरपत्रक दर्शनी भागात लावणे आवश्यक आहे. रुग्णालयाच्या आवारातील सहज दिसणाऱ्या आणि रुग्णांना सहज पोहोचता येणाऱ्या ठिकाणी हे दरपत्रक लावावे. दरांमध्ये बदल झाल्यास त्यानुसार दरपत्रक तातडीने अद्ययावत करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. भारतात उपचारांसाठी येणाऱ्या रुग्णांसाठी लागू असलेले दरही प्रदर्शित करावे लागणार आहेत.

**...तर रुग्णालयांवर कारवाई**

दरप्रदर्शनाच्या नियमांचे पालन होते की नाही, याचा संबंधित आरोग्य प्राधिकरणांनी वेळोवेळी आढावा घ्यावा. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.


**बृहन्मुंबई महानगरपालिका**

उप प्रमुख अभि. / ३१९२ / रस्ते / नियोजन दिनांक : १६.१०.२०२६

**निविदा सूचना**

| | |
|---|---|
| निविदा कागदपत्र क्र. | 2026_MCGM_1345243 |
| संघटनेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | बीएमसी अधिकारितेत सिलिकॉन सिलंटसह काँक्रिट पॅनेल्सची जॉइंट सिलिंग. (बोली क्र. 2026_MCGM_1345243_1) ई-निविदेची किंमत (अंदाजित किंमत) – रु. २५,००,००,०००/- बोली सुरक्षा ठेव / इरठे – रु. २५,००,०००/- |
| महाटेंडर पोर्टल | http://mahatenders.gov.in |
| निविदेचे निर्गमन व विक्रीची तारीख | १९.१०.२०२६ रोजी स. ११:०० वा. पासून पुढे |
| निविदेच्या विक्रीकरिता शेवटची तारीख व वेळ | ०२.११.२०२६ रोजी दु. ०४:०० वा. पर्यंत |
| लिफाफा "ए", "बी" व लिफाफा "सी"चे सादरीकरण (ऑनलाईन) | ०२.११.२०२६ रोजी दु. ०४:०० वा. पर्यंत |
| पूर्व-बोली तारीख | २३.१०.२०२६ रोजी स. ११:०० वा. |
| पूर्व-बोली सभा | उप प्रमुख अभि. (रस्ते) नियोजन यांचे कार्यालय, ५वा मजला, पंत नगर गॅरेज बिल्डिंग, घाटकोपर (पूर्व), मुंबई. (ईमेल : dyche.rdplg@mcgm.gov.in) |
| लिफाफा "ए"ची उघडणी | ०३.११.२०२६ रोजी दु. ०४:०० वा. पासून पुढे |
| लिफाफा "बी"ची उघडणी | ०३.११.२०२६ रोजी दु. ०४:२० वा. पासून पुढे |
| पत्रव्यवहाराकरिता पत्ता | उप प्रमुख अभि. (रस्ते) नियोजन यांचे कार्यालय, ५वा मजला, पंत नगर गॅरेज बिल्डिंग, घाटकोपर (पूर्व), मुंबई. (ईमेल : dyche.rdplg@mcgm.gov.in) |
| बोलीच्या उघडण्याकरिता स्थळ | उप प्रमुख अभि. (रस्ते) नियोजन यांचे कार्यालय, ५वा मजला, पंत नगर गॅरेज बिल्डिंग, घाटकोपर (पूर्व), मुंबई. (ईमेल : dyche.rdplg@mcgm.gov.in) |

हे निविदा कागदपत्र हस्तांतरणीय नाही.
**"बीएमसी" त्याकरिता कोणतेही कारण न देता वरील विषयाधीन स्वीकारलेला कोणताही किंवा सर्व अर्ज नामंजूर करण्याचा किंवा कोणताही अर्ज स्वीकारण्याचा हक्क राखून ठेवीत आहे.**

स्वाक्षरी/-१६.१०.२६
पीआरओ/१७२९/एडीव्ही/२०२६-२७ उप प्रमुख अभि. (रस्ते) नियोजन


# मोटारीच्या धडकेत बंदोबस्तावरील पोलीस उपनिरीक्षकाचा मृत्यू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** सप्तश्रृंग गडाच्या पायथ्याशी नांदुरी येथे नवरात्रोत्सवाच्या बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलीस पथकाला भरधाव मोटारीने धडक दिल्याने जिल्हा ग्रामीण पोलीस दलातील उपनिरीक्षकाचा मृत्यू झाला. या अपघातात तीन पोलीस कर्मचाऱ्यांसह पाच जण गंभीर जखमी झाले.

रविवारी पहाटे दोनच्या सुमारास नाशिकहून कळवणकडे जाणाऱ्या भरधाव मोटारीने नांदुरीच्या पायथ्याकडून नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या एका वाहनाला धडक दिली. त्यानंतर नांदुरी गावातील अभोणा टी-पॉइंटजवळ वाहतूक नियोजनासाठी उभारलेले अडथळे तोडून मोटारीने बंदोबस्तावरील पोलीस कर्मचाऱ्यांना धडक दिली.

या अपघातात जिल्हा ग्रामीण वाहतूक शाखेत कार्यरत पोलीस उपनिरीक्षक विजय गायकवाड (वय ५७) यांचा मृत्यू झाला. सहायक निरीक्षक दिनकर मुंढे, हवालदार सचिन राऊत आणि गृहरक्षक सचिन मोरे यांच्यासह मोरेश्वर पाटील (वय ५२, रा. महापे, मुंबई) आणि त्यांची पत्नी तेजस्वी पाटील हे जखमी झाले. मोटारचालक ओंकार सोनवणे (रा. अहिल्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




# जाहीर नोटीस

या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. श. तु. बांदकर, वय ५७ पद अभिलेखवाहक पुराभिलेख संचालनालय, १५६, सर कावसजी जहागीर रेडीमनी इमारत, महात्मा गांधी मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई-४०००३२ हे दिनांक १० मे २०१८ पासून कार्यालयाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता अथवा सक्षम प्राधिकाऱ्यांकडून रजा मंजूर न करून घेता कर्तव्यावर अनधिकृत अनुपस्थित (गैरहजर) आहेत. श्री. श. तु. बांदकर हे आपल्या निवासस्थानावरून तसेच कर्तव्यावरून बेपत्ता (हरविले) असल्याबाबत त्यांच्या कुटुंबियांनी कांजूरमार्ग पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदविली असून संबंधित पोलीस ठाण्याकडून दिनांक १३.०२.२०२६ रोजीचे हरविल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. संचालनालयामार्फत त्यांच्या सेवापुस्तकातील पत्त्यावर वेळोवेळी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.

त्याअर्थी, या जाहीर नोटिसीद्वारे श्री. श. तु. बांदकर, अभिलेखवाहक यांना अंतिम आदेश देण्यात येत आहे की, त्यांनी ही नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत या संचालनालयात स्वत: उपस्थित राहून आपल्या गैरहजेरीबाबतचा लेखी खुलासा सक्षम प्राधिकाऱ्यांसमोर सादर करावा व कर्तव्यावर रुजू व्हावे. विहित मुदतीत ते कार्यालयात हजर न झाल्यास किंवा त्यांच्याकडून अथवा त्यांच्या वतीने कोणताही समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांना शासकीय सेवेत राहण्याची इच्छा नाही असे गृहीत धरण्यात येईल. तद्नंतर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या तरतुदीनुसार कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्याविरुद्ध शासकीय सेवा समाप्तीची एकतर्फी विभागीय चौकशी व पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच भविष्यात उद्भवणाऱ्या कायदेशीर बाबींची संपूर्ण जबाबदारी सर्वस्वी श्री. श. तु. बांदकर यांची राहील याची नोंद घ्यावी.

दिनांक : १५.१०.२०२६
ठिकाण : मुंबई

सही/-
संचालक
पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य

डीजीआयपीआर/२०२६-२७/३२८३


# नियमपूर्ती करेपर्यंत खाद्य व्यवसाय थांबवा

## तुकाराम मुंढे यांचा व्यावसायिकांना सल्ला



**कराड :** अन्नसुरक्षेची नियमपूर्ती न करणाऱ्या खाद्य व्यावसायिकांनी नियमांची पूर्तता होईपर्यंत आपला व्यवसाय पूर्णपणे थांबवावा, प्रशासनाचा रोख हा केवळ नियमभंग करणाऱ्यांवरच असल्याचा इशारा अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला. नियमबद्ध व्यावसायिकांना घाबरण्याचे कारण नसल्याचे ते म्हणाले.

कराड दौऱ्यावेळी त्यांनी प्रीतिसंगमावर जाऊन माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीला अभिवादन केले. अन्नसुरक्षेबाबत मुंढे म्हणाले, ग्राहकांच्या आरोग्याचे रक्षण करणे हाच प्रशासनाचा मुख्य उद्देश आहे. तसेच नियमांचे पालन केल्यास व्यावसायिकांचा व्यवसाय अधिक सुरळीत आणि विश्वासाने वाढण्यास मदत होईल, असा विश्वास मुंढे यांनी व्यक्त केला. लोकांच्या ताटात सुरक्षित, दर्जेदार आणि पौष्टिक अन्न देणे ही प्रत्येक खाद्य व्यावसायिकाची प्राथमिक व नैतिक जबाबदारी असल्याचे मुंढे म्हणाले.


**यूव्ही ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लि. ("यूव्हीएआरसीएल")**
कॉर्पोरेट कार्यालय : १३०४, चिरंजीव टॉवर, ४३, नेहरू प्लेस, नवी दिल्ली - ११० ०१९

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता (स्विस चॅलेंज मेथड) ई-लिलावाद्वारे विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८ (६) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता (स्विस चॅलेंज मेथड) ई-लिलाव.
सूचना याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व हमीदारांना देण्यात आली आहे की, याखाली वर्णिलेली स्थावर मालमत्ता "यूव्ही ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड"कडे ("सुरक्षित धनको") गहाण आहे / ताब्यात आहे व सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे. स्थावर मालमत्तेची विक्री अझटेक प्रोसेसर प्रा. लि. व श्री. अजित नाकेर, श्री. अभिषेक नाकेर आणि श्री. आदित्य नाकेर यांच्याकडील "यूव्ही ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड"करिता देय रकमेवरील पुढील व्याज, खर्च व अन्य आकार यासह **२३.०९.२०२६** रोजीप्रमाणे थकित रक्कम **रु. ८,७१,३७,८१९** या रकमेच्या वसुलीकरिता **०५.११.२०२६** रोजी **"जसे आहे जेथे आहे","जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे"** या आधारे "स्विस चॅलेंज मेथड"द्वारा केली जाणार आहे.

| खाते / ऋणको / गहाकाराचे नाव | २३.०९.२०२६ रोजीप्रमाणे दावा रक्कम | मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत (अँकर बोली) / इसारा रक्कम (आरपीची २५%) | ताब्याचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| **ऋणको – अझटेक प्रोसेसर्स प्रा. लि. व तिचे "हमीदार" – श्री. अजित नाकेर, श्री. आदित्य नाकेर व श्री. अभिषेक नाकेर** | रु. ८,७१,३७,८१९ (रुपये आठ कोटी एकाहत्तर लाख सदतीस हजार आठशे एकोणीस फक्त) २३.०९.२०२६ रोजीप्रमाणे व मासिक बाकीसह पुढील व्याज आणि कोणतीही तदनंतरची जमा रक्कम, जर असल्यास, वजा करून वसुलीपर्यंत निघालेले व्याज यासह | प्लॉट नं. टीएस/२, एमआयडीसी, फेज-२, शागाव, मानपाडा रोडजवळ, डोंबिवली (पूर्व), ठाणे – ४२१२०४, महाराष्ट्र. | रु. ७,५०,००,०००/– (रुपये सात कोटी पन्नास लाख फक्त) **(अँकर बोली)**; रु. १,८७,५०,०००/– (रुपये एक कोटी सत्त्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त); **बोली वृद्धी : रु. ५,००,०००** (रुपये पाच लाख फक्त) | **प्रत्यक्ष ताबा** |

**मालमत्तेच्या पाहाणीची तारीख व वेळ : २९.१०.२०२६ रोजी स. ११.०० वा. पासून ते सायं ०५.०० वा. पर्यंत**
**इरठेच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख व वेळ : ०४.११.२०२६ रोजी दु. ०३.०० वा. पर्यंत**
**ई-लिलावाची तारीख व वेळ : ०५.११.२०२६ रोजी दु. ०४.०० वा. पासून ते सायं. ०५.०० वा. पर्यंत**

**शर्ती व अटी :**

१. लिलाव / बोलीप्रक्रियेचे आयोजन केवळ https://bankeauctions.com या वेबसाइटमार्फत "ऑनलाईन ईलेक्ट्रॉनिक बोलीप्रक्रिये"द्वारा असणार आहे. बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी ई-लिलाव विक्री प्रक्रियेत सहभागी होण्यापूर्वी सविस्तर शर्तींकरिता https://bankeauctions.com/ व https://www.uvarcl.com/ या वेबसाइटला भेटी द्यावी.
२. तेथे उक्त मालमत्तेस जोडून असलेली कोणतीही दायित्वे / भार व दावे ज्ञात नाहीत. मालमत्तेचा लिलाव "जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे काही आहे व जे काही आहे तेथे आहे" या आधारे आयोजिला जाणार आहे.
३. राखीव किंमत स्वीकारलेला मूल्यांकन अहवाल व अँकर बोलीवर आधारित निश्चित केलेली आहे. **वरील खात्याचा लिलाव हाती असलेल्या विद्यमान प्रस्तावावर आधारित "स्विस चॅलेंज मेथड" अंतर्गत आहे. अँकर बोलीदारास उच्चतर बोलीशी बरोबरी करण्याचा हक्क असणार आहे.**
४. स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी https://bankeauctions.com/registration/signup या लिंकद्वारा पोर्टल **"मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि."** यावर त्यांच्या नावांची नोंदणी केली पाहिजे आणि त्यांचा युजर आयडी व पासवर्ड विनामूल्य प्राप्त करावा. भावी बोलीदार https://bankeauctions.com/ या वेबसाइटद्वारा सेवा-पुरवठाकार **"मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि."**कडून ई-लिलाव प्रक्रियेवरील ऑनलाईन प्रशिक्षणाचा लाभसुद्धा घेऊ शकतील.
५. अधिक तपशीलाकरिता कृपया स. १०.०० व सायं. ०५.०० दरम्यान ८७७९५०७३४७ यावरून "यूव्हीएआरसीएल"च्या प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधावा किंवा resolutionteam@uvarcl.com, uvarcl@gmail.com यावर आम्हास लेखी विनंती पाठवावी किंवा बोलीप्रक्रियेसंबंधित शंकांकरिता सेवा-पुरवठाकार **"मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि."**, श्री. प्रभाकरन (संपर्क क्र. ७४१८२८१७०९), ईमेल : tn@clindia.com & support@bankeauctions.com मोबा. नं. : ७२९१९८११२४ /२५ / २६ यांच्याशी संपर्क साधावा. आजच्या तारखेनुसार "यूव्हीएआरसीएल"च्या प्राधिकृत अधिकारींना वरील स्थावर मत्ता / सुरक्षित मत्तेची विक्री, हस्तांतरण आणि / किंवा विल्हेवाट लावण्यापासून तेथे रोखणारा कोणताही आदेश आणि / किंवा न्यायालयाचा मनाई हुकूम नाही.
६. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटी www.uvarcl.com या सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर आणि ई-पोर्टल म्हणजेच https://www.bankeauctions.com यावर उपलब्ध आहेत.

*ही सूचना ऋणको / हमीदार / गहाणकारांनासुद्धा जर त्यांनी पूर्णतः त्यांच्या थकीत देणींचे प्रदान न केल्यास पूर्वोक्त तारखेदिवशी विक्रीच्या आयोजनाबाबत आहे.*

**दिनांक : १९.१०.२०२६**
**स्थळ : नवी दिल्ली**

**स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी**
**(यूव्ही ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड)**



# लोकसत्ता क्लासिफाइडस्

सगळ्यांकरिता सर्वकाही

## पाहिजेत

**पनवेलमधील** वृद्धाश्रमात स्वयंपाक करण्यासाठी २४ तास राहणारी महिला पाहिजे. संपर्क: 9158270033

0071065296-1

## पार्ट टाईम जॉब

**Explore-New-Income Opportunity! only for Age: 50+. Retired/ VRS/ Professionals. Attractive Package+ Extra Benefits. 9833682433/ 9029089681.**

0071065082-1

**सन्मान** आणि प्रतिष्ठेसह निवृत्त, VRS, NRI व सुशिक्षित महिलांना उत्तम संधी! संपूर्ण प्रशिक्षण/ मार्गदर्शन उपलबध. आकर्षक वेतन+ विविध लाभ : ९९३०४ ०९२२१.

0071065725-1

## जाहिरातविषयक

**‘‘व्हॉट्सॲपवरून पेपरमध्ये जाहिराती छापतो!’’ ‘‘टाईम ॲडव्हर्टायझिंग’’ लँडलाइन 02224466191/ 02224468556, मोबाईल- 8976181891 - ‘‘जागाविषयक’’ ‘‘विवाहविषयक’’ ‘‘ज्योतिषविषयक’’ “NOTICE” ‘‘हरवले सापडले’’/ ‘‘वाढदिवस’’ ‘‘नावबदल’’ ‘‘पुण्यस्मरण’’.**

0071031880-5

‘‘**जाहिराती** प्रसिद्धीसाठी’’ लोकसत्ता + सर्वच वर्तमानपत्रात ‘‘स्किम + डिस्काउंट’’ विवाहविषयक, जागाविषयक, श्रद्धांजली, शैक्षणिक, पाहिजेतच्या ’’Hightech’’, “Experts”, “Quick Response” (Sarvodaya Advertising) 9892797851/ 9322277986.

0071061317-1

## कुरिअर सर्व्हिस

‘**परदेशात** पार्सल’ अमेरिका, लंडन, दुबई, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युरोप. मिठाई, फराळ, कपडे, खाद्यपदार्थ घरपोच पिकअप. ओमदर्शन कुरिअर, ‘हिरेंद्र चौधरी’- 9699457066/ 9833631359.

0071063647-1

**परदेशात पार्सल : अमेरिका, युरोप, न्युजीलेन्ड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, दुबई, सिंगापूर, खाद्यपदार्थ, कपडे, मिठाई, मसाले, डॉक्युमेंट घरपोच सर्विस. निंबाळकर : 9869397122/ 9029026645.**

0071058255-1

## जागाविषयक

**Residential** & Commercial space available for sale. Prime location - Blood bank, Hospital, School, Coaching classes, Market are nearby. OC received- Mangal Narayan Residency, Gopal Nagar Lane No.2 corner, Dombivli East, Timing 10am to 1pm & 4pm to 8pm. Contact: 9920033328 / 9029682642.

0071064998-1

## मालमत्ताविषयक

**रेडी** पझेशन..! दिव्यता पार्क- 3BHK, बंगलो रोहाऊस, नारायणगाव, (शिवरायांच्या जन्मभूमीजवळ) पुणे. टाऊन प्लॅनिंग, बँक लोन, प्राईम लोकेशन, फायदेशीर, सुरक्षित गुंतवणूक, मोजकेच बंगले शिल्लक. बाजारभावापेक्षा कमी किमतीत. संपर्क- प्रशांत डेव्हलपर्स- 9821045832/ 9967150609

0071065328-2

## योगा

**गगनगिरी योगाश्रम खोपोलीला ३ दिवसीय निवासी योगशिबीर. २३, २४ आणि २५ ऑक्टोबर २०२६ या तारखांना आयोजिले आहे. संपर्क- 998750517/ 9820541598/ 9987237954.**

0071066154-1

## भविष्यविषयक

## ४४ वर्षांचा अनुभव असलेले, सत्य व अचूक भविष्यकथन करणारे एकमेव ज्योतिषी श्री. विजय हजारी- विवाहसौख्य स्पेशालिस्ट (व्हॉट्सॲपवरून भविष्यकथन शक्य). 9870335562.

0071032227-3

## मॅरेज ब्युरो

**सौ. कुळकर्णी विवाहसंस्था- सर्व जातीची वधूवरांची हजारो स्थळे उपलब्ध. (डॉक्टर्स, इंजिनिअर्स CA, MBA, उद्योजक, बँकर्स, कारखानदार, सेलिब्रिटीज. ४३ वर्षांची परंपरा. ‘‘पवित्रविवाह’’- 8108109309.**

0071014856-8

## यात्रासहल

***शास्त्रोक्त अष्टविनायक १२ नोव्हेंबर* *अमृतसर वैष्णोदेवी* *२६ नोव्हेंबर* *शास्त्रोक्त अष्टविनायक* *१८ डिसेंबर* *वाराणसी अयोध्या* *२५ डिसेंबर* *विचारे टूर्सवाले* *9321196238*, *9167671785***

0071066414-1

## यात्रासहल







**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.